म. ग्रं. सं. ठाणें
विषय
ग्रं. नं. 339

मित्रमंडळापुरतें

रा. देवदत्त नारायण टिळक
यांनीं निपाणी येथें ता. २८ व २९
डिसेंबर १९३२ रोजीं भरलेल्या
तिसऱ्या ख्रिस्ती साहित्य
संमेलनांत अध्यक्ष या
नात्यानें केलेलें

# भाषण



REFBK-0004808

शान्तिसदन नाशिक
९ ज्यानेवारी १९३३

मूल्य
आपली कृपा

REFBK-0004808

# महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य संमेलन

## येथील तिसरें अधिवेशन

## रा. देवदत्त नारायण टिळक यांचे भाषण

स्वागताध्यक्ष रे. डॉ. अपडीग्राफ व बंधुभगिनी.

रे. डॉ. निकल मॅक्निकल, रे. फादर विन्स्लो, रा. मनोहर कृष्ण उजगरे ह्यांच्या सारख्या मान्य ख्रिस्ती साहित्य सेवकांनीं जें अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें, तें आपण मला देऊन आपण माझा फार मोठा मान केला आहे. मी ह्या मानाला योग्य नाहीं ह्याची मला पूर्ण जाणीव असूनहि मी आपलें आमंत्रण स्वीकारलें, कारण लहान मूल स्वतःचा अंगठा चोखतां चोखतां मधेंच तो आपल्या आईच्याहि तोंडापुढें धरतो. तिनेंहि तो चोखावा अशी त्याची इच्छा असते. तसेंच माझे वेडेवाकडे विचार आपल्याहिपुढें मांडण्याची चालून आलेली ही संधी दवडूं नये असा एक स्वार्थी विचार माझ्या मनांत आला. आपण चोखलेला उष्टा आंगठा आईपुढें केल्यावर, आई त्याबद्दल अपमान मानून घेत नाहीं, उलट ती आपल्या बाळाचें कौतुकच करते. तसेंच आपणहि माझ्या धाष्ट्या-बद्दल न रागावतां माझें कौतुकच करणार आहां ह्याची मला आधींपासूनच खात्री असल्यानें—व आज माझें जें अपूर्व स्वागत तुम्हीं केलें त्यामुळें माझी खात्री द्विगुणित झाली असल्यानें—मी अध्यक्ष ह्या नात्यानें तुम्हापुढें उभा आहें.

काल येतांना गाडींत कोल्हापुरास जात असलेले कित्येक साहित्य सेवक भेटले. मी कोल्हापुरास न जातां एका लहानशा वाङ्मयसभेचा अध्यक्ष म्हणून दुसरीकडे जात आहें हें ऐकून मला असा प्रश्न विचारण्यांत आला कीं,

तुम्ही हें असें जातवार संमेलन कां काढलें ? उद्यां दैवज्ञ ब्राह्मणांचें एक साहित्य संमेलन निघेल, शांडिल्य गोत्रधारी लोकांचें एक साहित्य संमेलन निघेल, साठे उपनांव धारण करणारांचेंहि एक साहित्य संमेलन भरेल! मी मोठा मठ्ठ बुद्धीचा. त्या वेळेस मला चटकन संगतवार उत्तर देतां आलें नाहीं. पण अगोदर ज्यांचें उपकार मानण्याचें माझ्या मनात आहे, त्या डॉ. अर्जुन लक्ष्मण जाधव, रे. भास्कर कृष्ण उजगरे, रे. डॉ. अपडिग्राफ वगैरे सहृदय मित्रांच्या मूर्ती माझ्या डोळ्यापुढें—नव्हे हृदयापुढें उभ्या राहून तें घट्ट धरून म्हणूं लागल्या, डोळे मीट, कांहीं उत्तर देऊं नको, नीट निपाणीला चल. आम्ही तेथें तुझें स्वागत करण्याची वाट पहात बसलों आहों. हृदय बोलूं लागलें म्हणजे तें ऐकण्याच्या निमित्तानें तरी डोक्यास खालीं मान घालावी लागते. मला माझ्या प्रेमळ मित्रांचे त्यांच्या प्रेमळपणाबद्दल निदान उपकार मानण्यास तरी निपाणीला येणें भाग होतें. मी आलों.

येथें आल्यावर निराळ्या साहित्य संमेलनाची आवश्यकता काय हा विचार डोक्यांत घोळूं लागला. आम्हा वकीलांची ही रीतच आहे कीं, सगळी केस झाल्यानंतर मग argument किंवा ' तक्रार खायाची. ' ख्रिस्ती साहित्य संमेलनें आज १९२७ सालापासून भरत आहेत. असें निराळे साहित्य संमेलन कां, असा त्यावेळीं कोणीं प्रश्नहि केला नव्हता—उलट नाशकास आमचें पहिलें संमेलन झाल्यानंतर थोडक्याच दिवसांत पुण्यास भरलेल्या महाराष्ट्रीय साहित्य संमेलनांत श्रीपाद कृष्णांनीं अध्यक्षीय भाषणांत आमचा गौरवच केला होता. हें निराळें संमेलन सुरूं करण्याची आवश्यकता कां वाटली ह्याचें उत्तर आवश्यकता होती म्हणून ती वाटली असें एकच व सरळ आहे. आमच्या सुषुप्तसंवेदनेंत [ Sub Conscious ] त्याची कारण-मीमांसा झालेली असल्याशिवाय ती आवश्यकता वाटलीच नसती. आतां आपण सर्वजण तीं कारणें मनाच्या कपाटांतून थोडा वेळ बाहेर घेऊन येण्याचा प्रयत्न करूं.

दैवज्ञ ब्राम्हण, शाण्डिल्य गोत्रधारी, साठे उपनांव धारण करणारे वगैरे सर्वांचा ज्यांत समावेश होईल असा,-मराठी आपली माय बोली म्हणून तिचा अभिमान धरणारांचा—एक गट घ्या व मराठी आपली माय बोली असें म्हणून दाखविण्यास 'फॅशनेबल सोसायटीमध्यें' लाजणाऱ्यांची ज्यांच्यांत संख्या अधिक, अशा लोकांचा एक गट घ्या. पहिला गट वाङ्मयाच्या दृष्टीनें आपली सुधारणा सपाट्यानें करण्याच्या हेतूनें धूमधडाक्यानें पळत आहे, तर दुसऱ्याचे, डोळे तेवढ पडल्या पडल्या त्या पळणाऱ्या गटाकडे पाहून, आपणहि पळावें असें मनांत आणीत आहेत. दुसऱ्या गटाचे डोकें, पहिल्या गटाबरोबर पळण्याचीं, किंबहुना त्याच्याहिपुढें निघून जाण्याचीं स्वप्नें पहात आहे, तर पहिला खरोखर पळतच आहे. हें चित्र डोळ्यांपुढें उभें करून विचार करा कीं, नुसतीं स्वप्नें पाहून स्वप्नांत धूमधडाक्यानें पळणाराला, आधींच मैलभर पुढें गेलेल्याबरोबर एकदम पळण्यास सुरुवात करतां येईल का ? त्याला आधीं जागें झालें पाहिजे, आळ्या पिळ्या दिल्या पाहिजेत, व मग त्याला पळण्यास उठून उभें राहिलें पाहिजे. आमचें संमेलन त्या दुसऱ्या गटाला जागें करण्यासाठीं आहे, उठून उभें करण्यासाठीं आहे. आम्हीहि पूर्णपणें दैवज्ञ—शांडिल्य—साठे—संमेलनांत सामील होऊं, पण थोडा अवकाश आहे. रे. भा० कृ. उजगरे, रा. र. लु. जोशी वगैरे सारखी आमची कित्येक मंडळी त्या संमेलनांत पूर्णपणें सामील झाली आहे. दैवज्ञ-शांडिल्य-साठे ह्यांना आमच्यासारखी झोंप लागलेली नाहीं तेहि पळतच आहेत. तेव्हां त्यांना निराळ्या संमेलनाची गरज नाहीं. पळतां पळतां एकामेकांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांनीं पळायाचें एवढेंच. पण आम्हाला त्यांच्या खांद्यावर हात ठेवायाला जाण्यास एका मैलाच्या अंतरावरून, एका हाताच्या अंतरावर आधीं यावयाचें आहे.

निराळें संमेलन भरविण्याचें दुसरें कारण म्हणजे आमच्या आचार विचारांचा, धार्मिक विधींचा व धर्मशास्त्राचा अजून पूर्णपणें मराठी पेहराव बनावयाचा आहे. हा मराठी पेहराव बनेपर्यंत, व तो पूर्णपणें अंगावर लेईपर्यंत

तुमच्यात येऊन बसणें शिष्टसंमत होणार नाहीं. भरजरी कपडे लेवून नटून थटून जमलेल्या समाजांत उशीर झाला म्हणून वस्त्रपरिधानगृहांत आपलीं वस्त्रें अर्धवट टाकून जर कोणी येऊन बसला तर त्याला वेड्यांत काढतील. त्याची छी थू होईल. आमची अजून ती तयारी व्हावयाची आहे. आमच्या बायबलची भाषा सुधारण्याचा प्रश्न ऊहापोहाला महाराष्ट्र साहित्य संमेलन कशाला घेईल ? आमची उपासनापद्धति कशी असावी हा विचार महाराष्ट्र साहित्य संमेलन का करील ? आमच्या संगीतांत हिंदी चाली असाव्या कीं इंग्रजी चाली असाव्या ह्याची पंचाईत महाराष्ट्र साहित्य संमेलनांतील पंच कशाला करतील ? ही सर्व सामग्री आमची आम्हालाच आधीं नीटनेटकी करावी लागणार, मग आम्ही, तुम्हीं न सांगतांच तुमच्या सभेंत, तुमच्याशीं बरोबरीच्या नात्यानें येऊन बसूं.

आणखी एक गोष्ट लक्ष्यांत घ्यावयाला पाहिजे. वाङ्मयाच्या दृष्टीनें आमचा समाज बाल्यावस्थेंत आहे. बालमनाची ज्यांना पारख आहे ते सांगतील कीं मुलांना मारहाण करून ज्या गोष्टी करून घेतां येणार नाहींत, त्या उत्तेजनानें करून घेतां येतात. बालकाच्या मनाची जी गोष्ट तीच बालकवृत्तीच्या समाजाच्या मनाची गोष्ट असते. महाराष्ट्र साहित्य संमेलनांत भाग घेणाऱ्या एकाएका विद्वद्रत्नाची आमच्यांतील मोठ्यांतल्या मोठ्या विद्वानाशीं तुलना केली, तर ती वटवृक्षाची वटबीजाशीं केलेल्या तुलनेसारखी होईल. इतके आमचे ग्रंथकार तुमच्या ग्रंथकारापुढें लहान आहेत. ते तुमच्यांत मिसळून तुमच्याकडून कौतुक करून घेण्याची अपेक्षा करूं लागले, तर त्यांना शोधून काढायलाच तुम्हाला हातांत सूक्ष्मदर्शक यंत्रें घ्यावीं लागतील. बीजांत त्या वटवृक्षाइतकें मोठें होण्याची योग्यता आहे, आतुरता आहे. परंतु त्या वाढीला अनुकूल परिस्थिती निर्माण करावी लागते किंवा यदृच्छेनें ती निर्माण होते. आमचें संमेलन त्या वाढीला योग्य परिस्थिती निर्माण करण्यासाठींच आहे. आमच्या सर्व ग्रंथकारांना व लेखकांना उत्तेजन देणें आम्हालाच शक्य आहे. इतकें

कशाला, कांहीं कांहीं वेळेस झालेलें दुर्लक्ष्य मुद्दाम सुद्धां केस्यासारखें दिसतें. माझें म्हणणें चुकीचें असेल तर मला फार आनंद होईल. परंतु एक गोष्ट आपल्या परवानगीनें मी येथ नमूद करतों. नारायण वामन टिळक हे सर्वमान्य कवि होऊन गेले. ते वारलें तेव्हां एका अग्रगण्य वर्तमानपत्रांत त्यांच्याविषयीं वर्तमानसारांत केवळ दोन ओळींचा उल्लेख आला होता. त्यांच्यानंतर थोडे दिवसांनीं त्यांचे बंधु सखारामपंत वारले. सखारामपंत कांहीं प्रसिद्ध कवि नव्हते. पण ह्याच पत्रानें त्यांच्यावर अर्धे कॉलम खर्चीं घातलें व त्यांचा कवि म्हणून गौरव केला ! असेंहि होण्याचा, शेंकडा एक का होईना, पण संभव असतो. व बाल्यावस्थेमध्यें हेंच फार घातूक असतें. फोंफावलल्या वृक्षाला वाऱ्या पावसांचें कांहीं भय नसलें तरी कोंवळ्या अंकुरांना जळून जाण्यास नुसती उन्हाची एक तिरीप पुरते, वाहून जाण्यास पाण्याचा एखादा लहानसा ओघ पुरें होतो.

हें विवेचन पुरें करण्याआधीं आणखी एक गोष्ट सांगायाची आहे. यंदाच्या आमच्या संमेलनाच्या तारखा व महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या तारखा एकच का ठेवल्या; राजकारणांत स्वतंत्र मतदारसंघ तुम्हाला पाहिजेत तसेंच वाङमयांत कांहीं आहे कीं काय असाहि एक प्रश्न मला विचारण्यांत आला. ह्याचें उत्तर एवढेंच कीं ह्या तारखा निरनिराळ्या रहाव्या म्हणून आम्हीं आटोकाट प्रयत्न केला. साहित्य संमेलन व किंलास्कर संमेलन हीं संभाळून आम्हाला आमच्या तारखा ठरवावयाच्या होत्या. शिवाय नाताळाच्या दिवशीं व नववर्षाच्या दिवशीं पाहुणे मंडळीला आपापल्या घरीं राहायाला पाहिजे होतें. ह्या सर्व गोष्टी ठरल्यावर महाराष्ट्र साहित्य संमेलन ता. ३१ ला ठरलें व त्याला अनुसरून आम्हीं आपलें संमेलन ता. २८ व २९ ला ठेवलें. पुन्हां किर्लोस्कर संमेलन २९ ला ठरलें व महाराष्ट्र संमेलन २७ व २८ ला ठरलें हें कळतांच आम्हीं आपलें संमेलन एका दिवसांत आटोपून घेण्याचें ठरवून एका दिवसांत म्हणजे ता. २८ ला तें

आटोपून घेतलें !+ ह्यापेक्षां अधिक कांहीं करणें म्हणजे आधींच लांबणीवर पडलेलें आमचें हें संमेलन आणखी सहा महिन्यावर पुढें ढकलणें झालें असतें.

ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या पहिल्या दोन अधिवेशनांच्या तारखांत बरेंच साम्य असून, दुसऱ्या वेळच्या अध्यक्षांनीं तें साम्य त्यावेळीं आपल्या भाषणांत दाखविलें होतें. तारखांखेरीज त्यावेळीं आणखी एक साम्य होतें. तें म्हणजे गत व विद्यमान कवि लेखकांच्या कृतींचा व नांवांचा उल्लेख ह्या दोन्हीं संमेलनांत यथास्थित झालेला आहे. इतका कीं आतां मला त्या दृष्टीनें कांहीं सांगावयाचें जवळ जवळ उरलेंच नाहीं. तेव्हां नेहमींच्या ठराविक पद्धतीला टाळा देऊन हैदराबादेंत डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं

## वाङमयाचा आढावा

घेण्याचें जसें नाकारलें तसेंच मीहि नाकारणार आहें. आढावा घेणें हें अकलेचें व अत्यंत मेहनतीचें काम असलें तरी तें एक तऱ्हेचें यांत्रिक काम आहे व यांत्रिक काम करण्याचा बोजा अध्यक्षावर नसावा असें जे डॉ. केतकर म्हणतात तें मला सर्वस्वी सयुक्तिक वाटतें.

गेल्या वेळच्या ख्रिस्ती साहित्य संमेलनांत एकंदर सत्तर कवींचा व लेखकांचा उल्लेख करून शेवटीं 'साहित्य सेवकांची वर जी नामावलि मीं दिली आहे ती बरीच अपुरी असण्याचा संभव आहे; माझ्या माहितीप्रमाणें व स्मरणानें मीं ती दिली आहे इतकेंच' असें अध्यक्षांना म्हणावें लागलें. हें झालें आपल्या संमेलनाच्या अध्यक्षांचें. बडोद्यास भरलेल्या दहाव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रा. नरसिंह चिंतामण केळकर ह्यांनींहि गत लेखकांची अशीच एक भली मोठी यादी देऊन, त्या यादीच्या शेवटीं म्हटलें कीं "माझ्या विस्मरणामुळें इतरहि कित्येक नांवें या वाङमय तर्पणांत समा-

+ता. २८ ला संमेलन आटोपण्याचा मूळ बेत कांहीं विषय न संपल्यानें बदलून २९ ला सकाळीं थोडावेळ तें चालू ठेवावें लागलें.

विष्ठ होण्यासारखीं असून, गळलीं असतील; तर त्याबद्दल त्यांच्या मित्रमंडळीची मी क्षमा मागतों. ही क्षमा मागून झाल्यावर रा. केळकर विद्यमान वाङ्मय भक्तांची यादी देऊन पुन्हां म्हणतात "वरील सिंहावलोकनांत नजर चुकीनें अनेक ग्रंथ अगर ग्रंथकार उल्लेखावयाचें राहिले असतील. पण केवळ स्मरणानें हें विवेचन केलें असल्यानें असला प्रमाद होणें स्वाभाविक आहे. हें लक्ष्यांत घेऊन कोणी स्वत:करतां अगर दुसऱ्याकरतां रागावणार नाहीं अशी आशा आहे.

म्हणून आपल्या वाङ्मयभक्तांची किंवा त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांची यादी प्रसिध्द करण्याचें काम आपल्या विद्वान चिटणीसांवर सोंपवून मी गेल्या दोन संमेलनांतील आणखी एका साम्याकडे वळतों. हें साम्य ख्रिस्ती लोकांच्या वाङ्मयाविषयक प्रगतीसंबंधीं, पहिल्या दोन्ही अध्यक्षांच्या ज्या अपेक्षा होत्या त्यांत दिसून येतें.

पहिल्या संमेलनाच्या अध्यक्षांना "मराठी भाषेचा आस्थेवाईकपणानें व स्वाभिमानाच्या वृत्तीनें अभ्यास करण्याची प्रवृत्ति हल्ली मराठी भाषा बोलणाऱ्या ख्रिस्ती लोकांमध्यें अधिकाधिक वाढत आहे" म्हणून आनंद वाटला. त्यांनीं ह्या वाढत्या प्रवृत्तीचें कौतुक केलें. "एखाद्या राष्ट्रांत स्वदेशप्रेमाची लाट उसळली म्हणजे तिजबरोबर धर्मजागृति व वाङ्मयात्मक पुनर्जन्म या गोष्टी हटकून आढळतात......" या वर उल्लेखिलेल्या पुनरुज्जीवनाचा प्रवेश महाराष्ट्रीय ख्रिस्ती समाजांत व्हावा तितक्या प्रमाणांत झाला नसेलहि. तथापि तो अल्प प्रमाणांत कां होईना—झाला आहे यांत तिळमात्र शंका नाहीं." दुसऱ्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणतात "आपल्या ख्रिस्ती लोकांत स्वभाषेच्या बाबतींत आतांपर्यंत जरी विशेष जागृति दिसून आली नाहीं, तरी गेल्या कांहीं वर्षांपासून ती थोडी बहुत दिसूं लागली आहे हें खरोखरच सुचिन्ह आहे." दोन्हीहि अध्यक्षांना झाल्या ह्याच प्रगतिबद्दल आनंद वाटत आहे. दुसऱ्या संमेलनाचे अध्यक्ष हा आनंद व्यक्त

केल्यानंतर जी सूचना महाराष्ट्र ख्रिस्ती लोकांस करतात तीहि केवळ अध्ययन करावें एवढाच करतात. ते म्हणतात 'मित्रहो मराठी भाषेच्या आस्थापूर्वक अध्ययनावर मी विशेष जोर देतों—कवितेचें मार्मिक अध्ययन केलें पाहिजे. आपल्या महाराष्ट्र कवींच्या उक्ती अत्यंत बोधपर असल्यामुळें त्या आपण मुखोद्गत केल्यास उत्तम !'

पहिल्या दोन अध्यक्षांच्या अपेक्षांहून माझी अपेक्षा निराळी आहे. माझी भूक इतकी लहान नाहीं.

"खादाड असे माझी भूक
चतकोरानें मला न सूख
कूपांतिल मी नच मंडूक
मळ्यास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे"

अध्ययन अध्यपन ह्या गोष्टी फार महत्वाच्या आहेत ह्याबद्दल वादच नाहीं. परंतु आपली तेवढीच धांव असतां उपयोगी नाहीं.

'मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचा इतिहास' ह्या पुस्तकासंबंधीं रे. फादर विन्स्लो ह्यांनीं म्हटलें आहे कीं नाशकास प्रथम संमेलन भरलें त्यावेळीं "कांहीं महाराष्ट्रीय ख्रिस्ती मंडळी आपल्या देशाच्या सारस्वताचें गुणग्रहण करण्यास आपण स्वतः उत्तेजित व्हावें, इतरांस तें करावयास लावण्यासाठीं उत्तेजन द्यावें आणि त्याच्या सध्यां बनत असलेल्या सारस्वत संग्रहांत आपणहि भर टाकावी या सदीच्छेनें प्रेरित होऊन जमली होती." स्वतः आपल्या सारस्वतांत भर टाकण्यास १९२७च्या संमेलनांतहि उत्सुक असलेली मंडळी विन्स्लो साहेबांना दिसली. आज त्या गोष्टीला पांच सहा वर्षें झालीं आहेत. ख्रिस्ती लोकांची प्रगती फार सपाट्यानें होत आहे व ह्या सहा वर्षांत वाङ्मय दृष्टीनेंहि कमालीची प्रगती झालेली आहे. काल आगगाडींत कोल्हापूरच्या संमेलनास चाललेल्या एका विद्वान गृहस्थांनीं मराठी बायबलचीं भाषा

आतां फार उत्तम झाली आहे असें, मीं न विचारतांच मला बोलून दाखविलें. ते गृहस्थ बहुतकरून रावबहादूर आठवले ह्यांच्या नव्या करारासंबंधीं बोलत असावे. परंतु तें तरी काय थोडें झालें ? खिस्ती माणसास भाषेसंबंधीं टोले द्यावयाचा प्रसंग आला म्हणजे जें पवित्र शास्त्र ( बायबल ) त्याच्या डोक्यांत घालण्यास उपयोगी पडे त्याचीच भाषेसंबंधीं स्तुती ऐकून रे. विन्स्लो ह्यांनीं नाशकास १९२७ सालीं जें पाहिलें त्यांत कांहीं तरी तथ्य असलें पाहिजे व वाङ्मयाच्या दृष्टीनें नुसत्या पांच वर्षांत हा 'झोंपी गेलेला जागा झाला' असें म्हणण्यास हरकत नाहीं असें म्हणावें लागेल.

इतरांनीं आपणासाठीं वाङ्मय निर्माण करून, त्यांनीं भरून दिलेल्या ओंजळींनीं आपण तें प्यावें, हें मला कबूल नाहीं. आपल्यांत आपण इतकी धमक उत्पन्न केली पाहिजे, कीं आपली स्वतःची तृती होऊन शिवाय आपल्या ओंजळी दुसऱ्यासाठीं सदा भरलेल्या असल्या पाहिजे. आपल्याला जर कांहीं दिव्य संदेश आपल्या देशबांधवांना द्यावयाचे असतील तर ते आपणच दिले पाहिजे व तीच तयारी आपल्याला करायाला हवी.

पण ह्या ' बाटे ' लोकांच्या ओंजळींतून पाणी पिण्यास कोण तयार होणार ? एक ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं कोणीहि खरा खरा तान्हेला असला व तुम्ही त्याला पाणीच पाजणार असाल—दारू पाजणार नसला, विष पाजणार नसाल—तर तुमची जात पोत विसरून कोणीहि तुमच्या ओंजळींतील जीवनाचे घुटके घेऊन तृप्त होण्यास तयार होईल. हा मनुष्यस्वभाव आहे. ह्यांत पिणाराचे उपकार मानायाला नको, कीं आपण स्वतःबद्दल धन्यता मानायाला नको.

## आपली मराठी भाषा

बिघडलेली आहे वगैरे सांगण्याचा व आपण तें ऐकण्याचा इतका परिपाठ ठेवला आहे, कीं ह्या बाबतींत आपण नेहमीं निष्क्रिय होऊन बसूं लागलों

आहों. जो उठतो तो आपल्या कानींकपाळीं ओरडत असतो, कीं तुमची मराठी भाषा बिघडलेली आहे. माझें बोधसुधा नांवाचें पुस्तक महाराष्ट्रांतील मुलांना फार आवडलें. इतकें कीं एका वर्षांत त्याची २००० प्रतींची एक आवृत्ती खलास झाली. त्यावर उत्तमोत्तम अभिप्राय देऊन बहुतेक वर्तमानपत्रकर्त्यांनीं त्याचा गौरव केला. पण मीं ख्रिस्ती आहें व म्हणूनच माझ्या भाषेंत कृत्रीमपणा—ख्रिस्तीपणा—असलाच पाहिजे अशा पूर्वग्रहानें एका गृहस्थांनीं मला सांगितलें कीं पुस्तक फार सुंदर आहे पण त्यांत ख्रिस्ती भाषा आली आहे. कुठें आहे ती ख्रिस्ती भाषा असें विचारतां ती कांहीं त्यांना दाखवितां आली नाहीं. गृहस्थ विद्वान होते.

आपल्याकडे पाहण्याच्या तीन तऱ्हा आहेत. एक उपहासात्मक, दुसरी पूर्वग्रहमिश्रित व तिसरी पाठ थोपण्याच्या इच्छेची. पहिल्या तऱ्हेचें उदाहरण वरेरकरांच्या सन्याशाच्या संसारात सांपडेल. त्या नाटकांत ख्रिस्ती लोकांच्या भाषेची जी टवाळी केली आहे ती एखाद्या खललेखकालाहि करणें अवघड आहे. सत्य व असत्य ह्यांचें मिश्रण करून सत्याला असत्याची दासी बनविण्याची हातोटी ज्या लेखकाला साधली असेल त्याला मी खल–लेखक म्हणतों. संन्याशाच्या संसारांत जी भाषा ख्रिस्ती लोकांच्या तोंडीं घातली आहे ती भाषा वरेरकरांच्या डोक्यांतली आहे, ख्रिस्ती माणसाच्या तोंडची नाहीं. बायबलच्या जुन्या भाषांतरांतील कांहीं वाक्यें घेऊन व तीं आणखी वेडीवाकडीं करून त्या सामग्रीवर ह्या लेखकानें ही सारी स्वतःच्या डोक्यांतून काढलेली भाषा आहे. एक नवीन भाषा निर्माण करणारा म्हणून त्यांना कधींतरी एखादें पदक दिलें तर तें अनुचित होणार नाहीं.

पूर्वग्रहमिश्रित दृष्टीनें पहाणाऱ्यांचीं उदाहरणें पदोंपदीं आपल्याला आढळतात. वर मीं एक उदाहरण दिलेंच आहे. गेल्या महिन्यां मुलांकरतां मीं बुद्धाच्या कथा प्रसिद्ध केल्या आहेत. जातककथा हें त्य पुस्तकाचें नांव आहे. हें पुस्तक दुसऱ्या एका विद्वानाला मीं प्रेमाची

८५३१



सं.नि. ५०९ २३।५।३३

भेट म्हणून दिलें. पुस्तकाच्या कव्हर वरती बुद्धाचें छायाचित्र आहे. विद्वानांनीं तें हातांत घेतांच ह्यांत बुद्धाची कुचेष्टा निंदा वगैरे असेल ना असा मला अगदीं सरळ व मनापासून प्रश्न केला! ह्याहि प्रकारच्या लोकांचें कांहीं मला वाटत नाहीं, कारण पूर्वग्रहामुळें ते पूर्वेकडे पहात असले तर त्यांचा कान पकडून त्यांचें तोंड पश्चिमेकडे वळवितां येतें. पण तिसऱ्या प्रकारच्या लोकांशीं वागण्याचें काम फार कठीण असतें. ते स्वतःला फार मोठे समजतात व आपल्याला बाळें समजतात. हे लोक बाळांनीं काय केलें आहे हें न पाहतां त्यांना उत्तेजन द्यावयाचें ह्या सदीच्छेनें, पण मनांत बाळांच्या मूर्खपणाला हसत 'शाबास' म्हणत असतात. ह्यांच्या तोंडांत देऊन ती शाबासकी बंद पाडायाचें मनांत आलें तरी तें कठीण असतें कारण त्यांच्या ताडमाड उंच मानेमुळें त्यांच्या गालाला आपला तळहात पोंचत नाहीं.

ह्या तिन्ही प्रकारच्या लोकांमुळें—व ह्यांचाच भरणा फार असल्यानें आपली भाषा अगदीं टाकाऊ आहे असा आपला खोटा समज झालेला आहे. आपल्यांत कांहीं शब्दांचा विशेष भरणा, कांहीं कांहीं शब्दांचे उच्चार चुकलेले व कांहीं पाश्चात्यवाक्प्रचार ह्यामुळें क्वचित् प्रसंगीं आपली भाषा वेगळी वाटते. परंतु अडाणी बहुजन हिंदु समाजाच्या भाषेच्या कितीतरी पटीनें आपली भाषा प्रौढ व चांगल्या दर्जाची आहे.

ख्रिस्ती लोकांच्या मराठी भाषेला वळण लागणारे ज्ञानोदय थेट १८४१ पासून आजपर्यंत अस्तित्वांत आहे. हें पत्र ख्रिस्ती लोकांत तेव्हांपासून वाचलें जात आहे. ख्रिस्ती मुलांच्या भाषेची व मनाची योग्य वाढ व जोपासना व्हावी म्हणून १८७२ पासून बालबोधमेवा नांवाचे मासिक चालू आहे. ह्या दोन्हींच्या जन्माच्या वेळचें एकहि पत्र किंवा मासिक आज अस्तित्वांत नाहीं. ह्या पत्राचे व मासिकाचे जुने अंक चाळून पाहिले तर दत्त, केशवसुत, अनंततनय, ह्या कवींनीं आपली पुष्कळशी कविता ह्यांतूनच प्रसिध्द केलेली आहे असें दिसून

येईल. लहान मुलांवर व त्यांच्या बालमनाला झेपेल अशी कविता महाराष्ट्र वाङ्मयांत गेल्या दहाबारा वर्षांत पुष्कळ निर्माण झाली आहे असें वाटतें. पण बालबोधमेव्यांत सन १८८४ पासून अशा तऱ्हेच्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. परवां मला एका विद्वान साहित्य भक्तानें मुलांसाठीं त्यांनीं केलेली एक कविता म्हणून दाखविली. ही कविता–अर्थात् शब्दांची ठेवण निराळी असलेली–मी १८९५ च्या आधींच्या बालबोधमेव्यांत वाचलेली मला आठवली ! खिस्ती लोकांना अशा रीतीनें भाषेचें ज्ञान अगदीं व्यवस्थितपणें मिळालें असल्यानें बहुजन हिंदु समाजापेक्षां त्यांची भाषा चांगली असली तर त्यांत कांहीं नवल नाहीं. आज साक्षरतेचें प्रमाण पार्शी लोकांच्या खालोखाल खिस्ती लोकांतच आहे. तसेंच हिंदूंच्या कोणत्याहि समाजापेक्षां खिस्ती समाजांत स्त्रिया अधिक शिकलेल्या आहेत. अशा समाजाची मराठी भाषा बहुजन हिंदु समाजाच्या भाषेपेक्षां अधिक चांगली असणारच.

आतां बायबलची विकृत मराठी भाषा व खिस्ती लोकांत असलेले कित्येक विचित्र उच्चार ह्याबद्दल जर कोणाला दोष द्यावयाचा झाला तर तो मी, पैसे घेऊन मिशनरींना साह्य करण्यास पुढें आलेल्या शास्त्रीपंडितांसच देईन बायबलचें पहिलें व नंतरचीं भाषांतरें झालीं ती ह्या शास्त्रीपंडितांचें साह्य घेऊनच. तेव्हां 'हेंगाडें' भाषांतर झालें असलें तर त्याचा दोष ह्याच मंडळीकडे जातो. "पण भाषांतरकरांस यांतील बहुत भाषा असाव्या तशा अवगत नसल्यामुळें तीं भाषांतरें अगदींच भिकार झालेलीं आहेत. स्वतः भाषाज्ञान नसल्यामुळें भाषांतरकारांस सर्वस्वी विधर्मी पंडित व मुनशी यांजवर अवलंबून रहावें लागलें असावें हें उघड आहे; म्हणून ते सांगतील तसें करण्यांत प० शा० भाषांतर बिघडावें यांत नवल नाहीं. मराठी कामांत तर त्यांस पुरेंच अपयश आलें. त्यांनीं त्या कामास लावलेला पंडित नागपुराकडील कोणी होता असें दिसतें. नागपुराकडे मराठी भाषा

अशुद्ध बोलत, म्हणून तिकडची मराठी जाणणाऱ्या पंडितानें जें मराठी भाषांतर केलें तें अगदींच अशुद्ध होतें. हें भाषांतर महाराष्ट्राबाहेर कित्येक ठिकाणीं कांहींसें उपयोगी पडलें खरें तरी महाराष्ट्रास त्याचा काडीमात्र उपयोग झाला नाहीं." वरील उतारा '**बायबल सोसायटी काय आहे**' ह्या पुस्तकांतून घेतला आहे.

पण खरोखरच बायबलचें भाषांतर वाटतें तितकें हेंगाडें झालें आहे का, हाहि एक विचारांत घेण्यासारखा प्रश्न आहे. बालमित्राचीं, छत्र्यांनीं लिहिलेली पहिली आवृत्ती घेतली तर तिच्यातील मराठी आज आपल्याला हेंगाडेंच वाटेल. ह्याचें कारण बालमित्र हेंगाड्या भाषेंत लिहिलें होतें असा न घेतां आजची आपली मराठी भाषा पन्नास वर्षांपूर्वीं जी मराठी भाषा होती तिच्याहून भिन्न बनली आहे हाच उघड आहे. तेच बायबलच्या भाषांतरासंबंधीं म्हणतां येईल. मराठी भाषा वाढत आहे. बायबलचें भाषांतर परवापर्यंत जुनेंच राहिलें. हा फरक ध्यानांत घेतला तर हें एक मोठें कोडें आपोआप सुटेल. तरी बायबलचें भाषांतर होतां होईल तितकें चांगलें करण्याचे आटोकाट प्रयत्न, अगदीं पहिल्यापासून आजपर्यंत चालूच आहेत. ह्या मुद्यावर इतकें विस्तारपूर्वक बोलण्याचें कारण वरेरकर मामांनीं एका नाटकांत ख्रिस्ती लोकांची म्हणून योजिलेली भाषा व त्या नाटकानें ख्रिस्ती लोकांची व मराठी बायबलची भाषा सुधरली असा त्यांनीं पसरविलेला गैर-समज. सन्याशाच्या संसारांतील दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत रा. वरेरकर म्हणतात. 'परंपरेच्या दुराग्रहाचा लोखंडी साखळदंड वितळण्याइतकी ह्या नाटकाच्या परिणामाची आंच लागून मराठी बायबलची भाषा सुधरली.' मला येथें हें स्पष्टपणें सांगावयाचें आहे कीं सन्याशाच्या संसाराच्या जन्मा-आधींपासून किंबहुना वरेरकरांच्याहि जन्माआधींपासून बायबलची भाषा बदलण्याचे श्रमपूर्वक प्रयत्न चालू आहेत. बायबल सोसायटी अजूनहि झालेल्या भाषांतरावर संतुष्ट नाहीं व मामा

म्हणतात त्याप्रमाणें अजूनहि मराठी भाषा सुधरली असें बायबल सोसायटीला वाटत नाहीं. अजूनहि ती सुधारण्याचे प्रयत्न चालले आहेत. १८०५ सालीं बायबलच्या एका भागाचें पहिलें भाषांतर झालें. १८११ सालीं म्हणजे सवाशें वर्षांपूर्वीं संपूर्ण बायबल प्रसिद्ध झालें. तेव्हांपासून आतांपर्यंत लहान मोठ्या १५० आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या असून १९३१ पर्यंत कमींतकमी अकरा वेळेस भाषांतर सुधारणेच्या दृष्टीनें त्यांत कमी अधिक सुधारणा करण्यांत आलेल्या आहेत. भाषांतर करणारांना बांधून टाकणारे नियम असलेलें २२ पानांचें पुस्तक आहे. ह्या शिवाय हें काम एका हातीं नसतें. एक कमेटी असून ती प्रत्येक शब्दाचा कीस काढून नंतर पूर्ण विचारांनीं तो शब्द घेण्यांत येतो. ह्या कमीटींतील माणसें निरनिराळ्या व्यवसायांचीं असल्यामुळें त्यांच्या बैठकीहि रोजच्यारोज न होतां सोईसोईनें होतात. भाषांतरासंबंधीं बरेरकरांनीं व त्यांच्या चहात्यांनीं सन्याशाच्या संसाराला जी शाबासकी दिली आहे ती किती वेडगळपणाची आहे हें खालील उतारे दाखवितील. १९०४ सालीं छापलेल्या एका पुस्तकांतून हे घेतले आहेत.

" अनेक वेळां अनेक प्रकारें सुधारून निघालेली १८७२ सालची आवृत्ति बरीच वर्षें लोकमान्य राहिली होती पण अलीकडे ( १९०४ ! ) शास्त्राची बारीक तपासणी ( बहुतक नवें भाषांतर ) चालू झाली आहे. या तपासणींत शास्त्रांतील जे भाग सुधारले जातात ते हळू हळू सर्वमान्य आवृत्तींत सामील केले जात आहेत."

ह्याच्या आधींच्या भाषांतरासंबंधीं म्हटलें आहे कीं "या कमेटीची काम करण्याची पध्दत अशी दिसून येते कीं, ती शास्त्रांतील ज्या पुस्तकांचें भाषांतर करणें असे, तीं एकेका सभासदास वांटून देई. ते सभासद आपलें काम झालें म्हणजे तें दुसऱ्या सभासदांचे परीक्षणास पाठवून देत; त्यांनीं तें तपासून भाषांतरकर्त्याकडे परत पाठविलें म्हणजे ते आयल्या भाषांतरांत जी दुरुस्ती सुचविली असेल ती पाहून पुन्हां आपलीं पुस्तकें तपासीत, व मग तीं पुस्तकें तयार होत."

आणखी एक गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे, कीं हीं भाषांतरें इंग्रजी बायबल वरून करायाचीं नसून ग्रीकवरून करायाचीं असत. म्हणजे ज्याला ग्रीक उत्तम येते असे पंडित व ज्यांना मराठी उत्तम येते असे पंडित एकत्र जमून हें भाषांतर करायाचें असतें.

तेव्हां प्रत्येक वाक्य, नव्हे प्रत्येक शब्द तोलून उपयोगांत आणण्यासाठीं मधून मधून एकत्र जमणाऱ्या लोकांना शेकडों पानांचें पुस्तक ग्रीकवरून मराठींत उतरण्यास केवढा अवधी लागत असेल हा विचार तुम्हीच करा. पुष्कळ वर्षांपूर्वीं सुरू झालेलें भाषांतराचें हें काम वरेरकरांचें नाटक लिहिलें गेलें तेव्हां संपत आलें होतें. उत्तम मराठी भाषांतराची फांदी अगदीं मोडण्याच्या बेतांत आली असतां हा कावळा तिच्यावर जाऊन बसला एवढेंच.

आतां आमच्या लोकांत कांहीं शब्दांचे उच्चार असे चमत्कारिक का व त्याहि दोषाचें खापर शास्त्रीपंडितांकडे कसें पोंचतें करणें भाग आहे हें पाहूं. मी उदाहरणार्थ फक्त तीनच शब्द घेतों. लेंकरें, कोंकरें, सांपडला. ह्या शब्दांचा उच्चार लेङ्करें, कोङ्करें, साम्पडला असे करण्याचा पुष्कळ वर्षें प्रघात होता. अलीकडे गेल्या सहासात वर्षांत असल्या शब्दावरील अनुस्वार अजिबात काढून टाकण्यांत आले आहेत व हे शब्दोच्चार चुकीचे आहेत असें लोकांना समजून सांगण्यांत येत आहे. हीं अनुनासिकें आहेत व बोलतांना त्यांचा उच्चार करण्यांत येतो हें उघड आहे. आतां ज्याला लिहितां वाचतां मुळींच येत नाहीं त्याच्या हातून ही चूक मुळींच व्हायाची नाहीं हेंहि ओघानें आलेंच. म्हणजे ह्या चुका ज्याला लिहितां वाचतां येते त्याच्याच हातून घडतात. ख्रिस्ती लोकांच्या नॉर्मल स्कुलांत मराठी शिकविण्यास मुद्दाम हिंदु पंडीत ठेवले होते. ह्या पंडितांनीं आमच्यावर हे अनुस्वाराचे उपकार करून ठेवले. मुलांनीं अनुनासिकांच्या चुका शुध्द-लेखनांत करूं नयेत म्हणून अनुनासिकांचा उच्चार करण्यास ह्या पंडितांनीं

त्यांना भाग पाडलें. हींच मुलें पुढें शिकून व ह्या अनुस्वारांच्या चुकांत तरबेज होऊन इतर मिशन शाळांत शिक्षक झाले व त्यांनीं आपल्या गुरुजींच्या उपकाराच्या शृंखला समाजाच्या पायांत नेहमींच्याच अडकावून टाकल्या.

असो. ख्रिस्ती मराठी भाषा भासते तितकी बिघडलेली नाहीं व बिघडलेली भासते ती केवळ ह्या शास्त्रीपंडितांच्या उपकारामुळें एवढेंच मला सांगावयाचें आहे.

आतां आम्हाला दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी प्यावयाचें नाहीं. स्वतः-च्याच ओंजळीनें तें प्यावयाचें व जमल्यास दुसऱ्यांनाहि पाजायाचें असे ठरल्यावर पहिली जी गोष्ट आपण आपल्या मनाला सांगितली पाहिजे—व अगदीं ठासून सांगितली पाहिजे ती ही कीं वर दिलेल्या तीन कारणांनीं आमची भाषा बिघडली असल्याचें आम्हाला जें भासविण्यांत येतें तें खरें नाहीं. साधारण बहुजन समाजाची जी मराठी भाषा आहे तिच्यापेक्षां पुष्कळपटींनीं आमची भाषा चांगली आहे. ब्राह्मण वर्गाची भाषा, किंवा पंडितांची भाषा आमच्या भाषेपेक्षां किंचित् उच्चदर्जाची असेल, पण नुसता ब्राह्मणवर्ग म्हणजे सर्व मराठी बोलणारे नव्हेत. ब्राह्मण, प्रभु वगैरे कांहीं अल्पसंख्याक जाती सोडल्यावर बाकी जो मराठी बोलणारांचा प्रचंड समाज राहतो त्याच्या भाषेशीं आमच्या ख्रिस्ती लोकांच्या भाषेची तुलना करून पाहतां आमची भाषा किती उच्च दर्जाची आहे हें दिसून येईल. ख्रिस्ती माणसाची भाषा वाईट ही उगीच धूळ फेकण्यांत आली आहे हें वरील विवेचनावरून स्पष्ट दिसून येईल. आमची भाषा वाईट तर नाहींच नाहीं. आमची भाषा चांगली आहे व ती अधीक चांगली करून आम्ही दौड मारणार व महाराष्ट्र साहित्यांत थोड्याच वर्षांत हक्काचें स्थान पटकावणार अशी आमची उमेद आहे.

वर केलेल्या विवेचनावरून हेंहि स्पष्ट झालेंच आहे कीं बहुजन समाजापेक्षां जरी आमची भाषा उत्तम असली तरी महाराष्ट्र साहित्यांत

जागा मिळेल अशी ती आज नाहीं. ती जागा मिळविण्यास भाषेविषयीं जी अनास्था दिसते ती तर नाहींशी झालीच पाहिजे. द्वितीय ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांनीं सांगितल्याप्रमाणें ' मराठी भाषेच्या आस्थापूर्वक अध्ययनावर विशेष जोर दिला पाहिजे. ' व रे. भा. कृ. उजगरे व त्यांचे बंधु रा. म. कृ. उजगरे ह्यांच्या अशा तऱ्हेच्या श्रमपूर्वक लिखाणाबद्दल येथें मी गौरवपूर्वक उल्लेख करण्याची परवानगी घेतों.

पण ह्या प्रकारचें लिखाण पुरें नाहीं. ह्यानें आपल्याला व्हायाला पाहिजेत तीं कार्यें होत नाहींत. स्फुल्हिंगानें लिहिलेल्या लिखाणांत व मेहनतीनें लिहिलेल्या लिखाणांत हें अंतर असतें. रे. विश्वासराव सात्राळकर किंवा रा. शाहू दगडोबा उजगरे हे तशा स्फुल्लींगानें प्रवृत्त होऊन लिहिणारे लेखक आहेत. महाराष्ट्र सारस्वतांत स्फुल्लींगानें लेखन करणारे आगरकर व केशवसुत, किंवा राजकीय बाबतींत बाळ गंगाधर टिळक हीं उत्तम उदाहरणें आहेत.

एकदां आपल्याला लिहितां येतें असा आत्मविश्वास उत्पन्न झाला म्हणजे लेखनकलेला सुरुवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. इमर्सननें ह्या बाबतींत काय म्हटलें आहे तें किर्लोस्कर मासिकांत वाचण्यास मिळालें.

' एका आत्मविश्वासामध्यें सर्व थोर गुणांचा अंतर्भाव होतो. आत्मविश्वासा पाठोपाठ मोठेमोठे गुण आपोआप येतात. तुमच्या मनांत सहज—स्फूर्तीनें ज विचार येतात ते खरे व जगास आवश्यक आहेत असा विश्वास धरा हें इमर्सनचें सांगणें आहे !

' आपले विचारांची वास्तवीक किंमत माहीत असणें यालाच मोठेंपणा म्हणतात. आत्मविश्वासाचे अभावीं आपण पुष्कळ वेळां आपले मनांत आलेला एखादा सुंदर विचार तो वेडेपणाचा असेल अशा भीतीनें टाकून देतों. पण कांहीं दिवसांनीं तोच विचार दुसऱ्या कोणत्या तरी प्रसिद्ध ग्रंथकाराच्या नव्या पुस्तकांत आलेला पाहून आपणांस किती

लाज वाटतें ! आपणास सुचलेला विचार आपण न अव्हेरतां आपलेजवळ ठेवला असता व त्याचा योग्य रीतीनें पुरस्कार केला असता तर किती सुंदर गोष्ट झाली असती ! दुसऱ्या लोकांच्या घरीं वाढणारें, पण आपण टाकून दिलेलें मूल पाहून एक प्रकारचें वैषम्य ज्याप्रमाणें वाटतें त्याप्रमाणें आपले विचार दुसऱ्याचे मार्फत प्रकट झालेले पाहून वैषम्य वाटतें !

'म्हणून स्वतःचे विचारांचा अव्हेर करूं नका. माझे विचार चुकीचे तर नसतील ना अशी व्यर्थ शंका घेऊं नका. तुम्ही एकाग्र चित्तानें परिश्रमपूर्वक स्वानुभवानें जे विचार मनांत आणाल त्यांच्या खरेंपणाविषयीं अभिमान बाळगा. या विचारांसाठीं वाटेल तो स्वार्थत्याग सोसण्याची तयारी ठेवा. तुमचे विचार कदाचित जगाला पटले नाहींत तरी तुम्ही त्यांचा त्याग करूं नका. असा एक काळ येईल कीं सर्व जग आपले विचाराचा स्वीकार करील. पब तसें होईपर्यंत तुम्हाला ज्या यातना, जो छळ सोसावा लागेल त्या यातना व तो छळ आनंदानें सोसा. सत्याचेसाठीं कितीहि दुःख भोगण्याचा प्रसंग आला तरी सत्याची कास घट्ट धरा,

ज्या ग्रंथकारांच्या लेखणीनें विचारक्रान्ती होईल, निदान विचारांना वळण लागेल असे ग्रंथकार आपणांस पाहिजे आहेत. आमचे लेखक दुसऱ्यांचे पडसाद उमटविणार नुसते कानेकोपरे किंवा नुसतीं खबरदारें असतां उपयोगी नाहीं. ते दुसऱ्यांनीं काढलेल्या सुरावर नाचणारेहि नकोत. परप्रत्ययी चंद्र थकल्या भागल्या जीवाला कितीहि आल्हादकारक वाटला तरी ज्याला एखादें कार्य करायाचें असेल त्याला त्याचा उपयोग नाहीं. चंद्रापेक्षां सूर्य तापदायी वाटला तरी तो सामर्थ्यवान असतो.

मी म्हणतों असे लेखक अजून आमच्यांत निर्माण व्हावयाचे आहेत. ह्या लेखकांच्या आगमनोत्सवासाठीं झाडझूड करणारे आपण केवळ दास आहों. Bee कवीनें कवींबद्दल म्हटल्याप्रमाणें

भारतवर्ष नभोमुकुरावर साऱ्या पूर्वेभर
चिन्हें दिसतीं महाकवींच्या आगमनोत्सवपर

अशी आजची आपली परिस्थिती आहे. आपली आजची चळवळ, आपलीं हीं तीन संमेलनें, वाङ्मय विषयक आपला वाढता उत्साह ह्या साऱ्या गोष्टी आपला आशादीप तेवत ठेवीत आहेत. ज्यांच्याकडे पाहून हिंदुस्थानानें बा म्हणावें असे ग्रंथकार आपल्यांत निर्माण होणार अशी शुभवार्ता ह्या गोष्टी सांगत आहेत.

नारायण वामन टिळकांच्या मृत्युनंतरच्या एका तपाच्या काळांत स्वतंत्र वृत्तीनें व कोणास न भीतां जर कोणीं कांहीं लिहिलें असेल तर माझ्या मतें तें फक्त तिघाजणांनीं. ठराविक चाकोरीच्या बाहेरून प्रवास करण्याचें धैर्य ह्यांच्या अंगीं आहे. त्यांच्या मतांमुळें हे कोणाला वंदनीय वाटले नाहींत तरी त्यांच्या अंगच्या धैर्यामुळें त्यांच्यापुढें कोणीहि मान तुकवील. हे तिघे गृहस्थ म्हणजे रेवरेंड दिनकर शंकर सावरकर रावबहादूर बापू नारायण आठवले व राजश्री शाहू दगडोबा उजगरे हे होत. प्रत्येकाला आपल्या लिखाणाबद्दल समाजानें द्यावयाचा तितका त्रास देऊन घेतला. परंतु शेवटपर्यंत ह्या तिघांपैकीं एकानेंहि आपलें धैर्य सोडलें नाहीं.

रे. दिनकर शंकर सावरकर ह्यांच्या धैर्याची गोष्ट सर्वश्रुतच आहे. त्यांना अमूक एक गोष्ट सत्य म्हणून पटल्यावर त्यांच्यावर खिस्ती ईश्वरविज्ञान्यांचा केवढाहि मोठा गहजब झाला तरी त्यांनीं आपली भूमिका सोडली नाहीं. त्यांची मतें मलाहि पसंत नाहींत. परंतु त्यांच्या धैर्याबद्दल व स्वमतप्रेमाबद्दल मला त्यांचेसंबंधीं फारच आदर वाटतो

दुसरे गृहस्थ रा. शाहू दगडोबा उजगरे. ह्यांची ही एकच कविता पहा.

होता खात पोटभर । याचा पूर्वज महार
आला मिशनरी कोणी । लोळवीत ख्रिस्तवाणी
माथा त्याचा थापटीला । ख्रिस्ती करून टाकीला
म्हणे सारा ख्रिस्ती लोक । आत्मा तरला हा एक
पण जगा ठावा काय । याला पगार जो होय
करी इकडे गांवकी । खाई पडींही सडकीं
असा ख्रिस्ती धर्म झाला । गांवोगांव बोकाळला
दास म्हणे क्रियानष्ट । असे जाळितात पोट

शाहूरावांच्यावर हा अभंग प्रसिद्ध झाल्यावर काय व कवढा गहजब झाला असेल ह्याची ज्याची त्यानेंच कल्पना करावी.

तिसरे गृहस्थ रावबहादूर बापूराव आठवले. रा. आठवल्यांनीं नव्या कराराचें सुबोध भाषांतर केल्यावर त्यांच्याविरुद्ध जें एक मोठें वादळ उठलें त्याचा इतिहास इतका ताजा आहे, कीं त्याची येथें शाब्दिक पुनरावृत्ति करण्याची गरज नाहीं. परंतु रावबहादूर आठवल्यांनीं आपलें धैर्यहि सोडलें नाहीं व कार्यहि सोडलें नाहीं. आपल्या पटलेल्या सत्याबद्दल ह्या व्यक्तींच्या अंगीं जी तळमळ दिसून येते व तें सत्य जगापुढें मांडण्यांत त्यांनीं जें धैर्य दाखविलें त्याबद्दल त्यांची तारीफच केली पाहिजे.

वर निर्देश केलेल्या व्यक्तींबद्दल मी तारीफ केली तशी आपल्यांत असलेल्या आणखीहि कांहीं धीट माणसांची कां केली नाहीं असा प्रश्न टाकण्यांत येईल. त्याला माझें उत्तर असें आहे कीं त्यांच्या अंगीं धैर्य असलें तरी तें दूषित धैर्य आहे. तें धैर्य त्यांच्या मनाला पटलेल्या सत्यामुळें उत्पन्न झालेल्या तळमळीचें आविष्करण नसल्यानें त्या धैर्याला त्याच्या उत्पत्तीला कारणभूत झालेल्या भावनांप्रमाणें, राग, असूया, हेवा

ग्रं. क्र. ८८०८

वगैरे नांवें देतां येतील. नाशिकच्या नांना फरारीच्या अंगीं अलोट धैर्य होतें, परंतु त्यांचे कधीं कोणी कौतुक करतें का ? ह्याचें कारण नानाचें कार्य पवित्र नव्हतें. दुसऱ्याला हाणून पाडण्यासाठीं, किंवा दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होऊन, किंवा तिसऱ्यावर आपला बोज बसविण्यासाठीं ज्या धैर्याचें प्रदर्शन होतें त्याची तारीफ कोणी करणार नाहीं.

पंधराव्या महाराष्ट्र–साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रा. वामन मल्हार जोशी ह्यांनीं आपल्या भाषणांत म्हटलें आहे 'आपणांस जें सत्य प्रतीत झालें असेल किंवा प्रमाणभूत वाटत असेल त्या सत्याची प्रल्हादाप्रमाणें आपण भक्ति केली पाहिजे.'

पूर्ण सत्य काय आहे ह्याबद्दल नेहमीं मतभेद होणार. एकाला जें सत्य वाटेल तें दुसऱ्याला पटणार नाहीं. पहिल्याचें म्हणणें चुकीचें व घातक आहे असें दुसऱ्याला मनापासून वाटेल. परंतु पहिल्यानें आपल्या मनाची पूर्ण खात्री करून घेतली व त्याची सदसद्विवेकबुद्धी त्याला ग्वाही देऊं लागली कीं तुला जें सांपडलें आहे तेंच सत्य आहे तर त्याला तें आपल्यापुरतें तरी सत्य समजण्यास हरकत नाहीं.

त्या शोधकापेक्षां अधिक दूर दृष्टीच्या व खोल विचाराच्या माणसाला तें सत्य वाटणार नाहीं; किंवा चहूंबाजूंनीं विचार करणाऱ्या व्यवहारज्ञान्याला तें पटणार नाहीं; किंवा नुसत्या डोळ्यानें किंवा नुसत्या हृदयानें त्याच्याकडे पाहणाराला तें रुचणार नाहीं. तरी ज्याला तें पटलें त्याच्या दृष्टीनें तें सत्यच राहणार. त्यानें आधीं आपल्या बुद्धीनें तें ठरविलेलें असणार, हृदयानें शोधलें असणार व शेवटीं सदसद्विवेकबुध्दीच्या तागडीनें तें मोजलें असणार.

अशा रीतीनें जन्म पावलेल्या सत्यावर त्याच्या जन्मदात्याचें एखाद्या आईप्रमाणें प्रेम असणार हें सहाजिकच आहे. ह्यालाच आपण सत्याची तळमळ म्हणूं. असें हें सत्य मनाला पटलें नाहीं तरी निदान तें मनापासून ऐकण्याची कोणाचीहि तयारी असणार.

आपल्या लोकांत सत्यशोधक व सत्यवक्ते पुष्कळ आहेत परंतु त्यांचें बोलणें ऐकणारांना पटत नाहीं. कारण ते ज्याला सत्य म्हणून संबोधितात तें त्यांच्याच मनाला पटलेलें नसतें. त्यांची तळमळ असते ती त्यांच्या सत्यासाठीं नसते. ती कोणाच्या तरी उसनवारीबद्दल असते. आपल्या स्वतःच्या मुलासंबंधीं जी तळमळ वाटते ती दुसऱ्याच्या मुलाबद्दल वाटत नाहीं. तसेंच ह्यांचें होतें.

विचार दुसऱ्यांचे जरी घ्यावयाचे झाले तरी आधीं तें पूर्णपणें आपल्याला पचवावें लागतात. ते आधीं पूर्णपणें आपले बनविले पाहिजेत. तसें न करतां ते आहेत तसेच दुसऱ्यापुढें मांडण्याची जी घाई करण्यांत येते तिच्यामुळेंच त्या वाङ्मयाचा दुसऱ्याच्या मनावर परिणाम होऊं शकत नाहीं. डिसेंबर महिन्याच्या एका ख्रिस्ती मासिकाचा अंक माझ्यापुढें आहे. ह्यांत येथून तेथून सर्व भाषांतरें आहेत अर्थात् मूळ लेखकाला आपल्या लिखाणाबद्दल वाटलेली तळमळ जेवढी ह्या भाषांतराच्या चरकांतून उरू शकली तेवढीच वाचकांच्या पदरीं पडणार. भाषांतर अगदींच त्याज्य किंवा भाषांतर करणें म्हणजे मराठी भाषेचा गुन्हा करणें असें मी म्हणत नाहीं. भाषांतरासंबंधीं रा. न. चिं केळकर म्हणतात "व्यक्तिविषयक कीर्तीच्या किंवा अभिमानाच्या दृष्टीनें भाषांतराचा उपयोग पुष्कळच आहे. जगांत सोळा आणे स्वयंस्फूर्त असे वाङ्मय फारसें मिळणार नाहीं. आज इंग्रजी वाङ्मय खूप श्रीमान् व समृद्ध असें दिसतें पण त्यांतील पुष्कळसा भाग भाषांतरानें व्यापिलेला आहे. विशेषतः Classics किंवा मूर्धाभिषिक्त असे जे ग्रंथ कोणत्याहि भाषेत असतील ते सर्व जगाची जिंदगीच होत; व ज्यांची अव्वल दर्जाची प्रतिभा सांडून वाहावत नाहीं, त्यांनीं उत्कृष्ट ग्रीक, रोमन, जर्मन, फ्रेंच इंग्लिश ग्रंथांचीं भाषांतरें केल्यास मराठी भाषेवर तो उपकारच होईल. शिवाय भाषांतर करण्याचेहि इतके चांगले प्रकार आढळतात कीं,

स्वतंत्र पण वाईट विचारांपेक्षां भाषांतरित पण सुंदर विचारांचा ग्रंथ सामुदायिक दृष्टीनें अधिक चांगला." परंतु रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचें ह्याच विषयावर असें म्हणणें आहे कीं "परकीय भाषांतील उत्तमोत्तम ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें होणें जरूर आहे, त्याबद्दल वाद नाहीं. पण अशा एका ग्रंथामागें पांच तरी बऱ्यापैकीं स्वतंत्र ग्रंथ तयार झाले पाहिजेत."

आपल्याकडे नुसत्या ग्रंथगोष्टीच नव्हे तर सर्व विचार आचारहि आधाशासारखे गिळले व अपचन झालेले दिसून येतात. अग्निमांद्य झालेल्याला ज्या प्रमाणें उपाशी ठेवणें बरें त्याचप्रमाणें ख्रिस्ती लोकांना झालेल्या ह्या भाषाविषयक अग्निमांद्यावर पूर्ण लंघनाचाच तोडगा सुचविला पाहिजे. ख्रिस्ती लेखकानें उद्यां उगवणाऱ्या नववर्षाला हा निश्चय करावा कीं मी निदान एक वर्षपर्यंत तरी भाषांतर करणार नाहीं. मला येईल तसें मी स्वतःचें लिहीन. **आपल्या सत्याविषयीं खात्री, ती सांगण्याची तळमळ, व त्या तळमळीनें उत्पन्न होणारी वीरवृत्ति हीं असलीं म्हणजे**

## रांगड्या भाषेंत

**जरी एखादें तत्व प्रतिपादिलें तरी तें ऐकणाऱ्या मनाचा ताबा घेतल्याखेरीज राहात नाहीं.** ध्वनीचें कार्य कानांपर्यंत असतें. फार झालें तर एखाद्या विषयासंबंधीं तो मनाची पूर्व तयारी करील. परंतु मनामनाची भाषा कळकळ हीच असतें. उपमा अलंकारांनीं नटलेली भाषा हृदयाला किंचित् थोड्याशा गुदगुल्या करून जातील. मला एकदां फार थोडाशा दिवसांच्या अंतरानें कविसम्राट टागोर व दरिद्रीनारायण गांधीं ह्यांचीं भाषणें ऐकण्यास मिळालीं. त्या गोष्टीला आतां हा वर्षें होऊन गेलीं. कविसम्राटांचा मंजुळ ध्वनि व तोहि उपमालंकाराच्या वस्त्राभरणानें नटलेला जसा नाचत नाचत आला तसाच

नाचत नाचत निघून गेला. परंतु गांधींच्या भाषणानें केलेला परिणाम कायम राहिला. कारण एकाचे वाग्बाण डोक्यावरून सुरकन् निघून गेले. दुसऱ्यानें नेम डोक्याखालीं धरला असल्यानें ते येथें हृदयांत कायमच रुतून बसले.

' आई दूध दे ग, भूक लागली आहे ' असें म्हणण्याऐवजीं 'प्रियतम माते, माझी क्षुधा प्रदिप्त झाली आहे थोडें दुग्धपान करूं देशील काय ' असें म्हटलें तर दुधाची धार तोंडांत पडण्याऐवजी खरोखरीचीच तोंडांत मिळायाची. आपल्यांत अशी एक वाईट खोड आहे कीं भाषा करतां येईल तितकी अवघड करायाची, अवघड शब्द वापरायाचे, उदाहरणें इंग्लंड अमेरिकेंतील द्यावयाचीं, उपमा परकीय शोधायाच्या; ' बर्फापेक्षां पांढरें ' ही एकच उपमा घेऊं. बर्फापेक्षां पांढरें म्हणणारानें उभ्या जन्मांत कधीं बर्फ ( Snow ) पाहिलेलें नसतें. परंतु चुकून कधीं कापसापेक्षां किंवा दुधासारखें—पांढरें असा शब्दप्रयोग तोंडांतून पडायाचा नाहीं.

परकीपणा पूर्णपणें झुगारून दिल्यावर आपण आपल्या मनाला पटलेलें सत्य मनापासून सांगूं लागलों तर ते ऐकणारे शेंकड्यांनीं मिळतात. तात्याबा नालेगांवकर हे एक मांग जातींतून ख्रिस्ती झालेले गृहस्थ होते. त्यांनीं ख्रिस्ती झाल्यानंतर आपला मांगवाडा सोडला नव्हता. त्यांच्या भाषेवरहि—शिक्षण नसल्यानें—शिक्षणाचा पगडा बसलेला नव्हता. अगदीं रांगड्या भाषेंत त्यांनीं पद्यें रचिलीं. पण तीं रांगड्या भाषेंतील पद्येंहि मनाला भिडणारीं असत. ' लटकाच बाट खोटा, ' ' काल झालें तें आजहि व्हावें अशी इच्छा तुम्हि धराल का? ' वगैरे पद्यांचीं कडवीं माझ्या डोक्यांत अजून गुणगुणतात. तात्याबांचें हें एक पद पहा:—

बहु सुंदर तव हात । आइ माझे । बहु सुंदर तव हात ॥
तयांसारखें मम उपयोगीं कांहिं न गे जगतांत ॥

होतों मि बाळंत्यांत । आइ माझे । होतों मि बाळंत्यांत
किती गे जपुनी मज कवटाळिशि । प्रेम तुझें अतोनात ॥
बहु सुंदर तव पाय । आइ माझे । बहु सुंदर तव पाय
मजमागें दूडदूड धावले न घडो मजशिं अपाय ॥
बहु सुंदर तव मूख । आइ माझे । बहु सुंदर तव मूख
आनंदी तें पाहून लाधे मजला सारें सूख ॥
बहु सुंदर तव कान । आइ माझे । बहु सुंदर तव कान ॥
बोल बोबडे ऐकुन माझे विसरति अवघे भान ॥
बहु सुंदर तव नेत्र । आइ माझे । बहु सुंदर तव नेत्र
मजसाठीं ते किति गे शिणले आजवरी अहोरात्र ॥
किती सुंदर तव रूप । आइ माझे । किती सुंदर तव रूप
पवित्र जितके भाव मनाचे देइ तयांस हुरूप ॥
वर्णाया तूं पात्र । आइ माझे । वर्णाया तूं पात्र
तव उदरीं मज ज्यानें धाडिलें धन्य तयाचें सूत्र ॥

ह्या अशिक्षित मांग जातींतून ख्रिस्ती झालेल्या गृहस्थानें जें कवित्व दाखविलें आहे तें, आपलें ध्येय अमुक एका भाषेंतच पुढें मांडायाचें म्हणून अडून न बसल्यामुळें.

रा. नरसिंह चिंतामण केळकर ह्यांनीं वाङ्मयाचा हेतू काय असावा ह्याविषयीं दहाव्या साहित्य संमेलनप्रसंगीं विवेचन केलें आहे. त्यांत ते म्हणतात 'वाङ्मयालाहि सत्याची चाड आहे; पण कलाविलासाच्या द्वारानें जें सत्य प्रतीत होण्यास कबूल होईल त्या सत्याचीच. अडेल तट्टू सत्याकरितां वाङ्मय थांबून राहणार नाहीं तर स्वतःचें सत्य निर्माण करून कार्यभाग करून घेईल.'

येथें मला स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं कलाविलासासाठीं त्याला जुळेल असें सत्य शोधून ख्रिस्ती लेखकाचें चालणार नाहीं. तो

आधीं सत्य शोधील व तें सत्य अडेल तट्टू ठरलें तरी तो परवा करणार नाहीं. त्या अडेल तट्टाचा अडेलपणा संभाळून कलाविलासाचीहि पर्वा न करतां तें सत्य तो आहे तसें सांगत सुटेल. तें सत्य त्याला पटलें, त्याची तळमळ लागली, त्या तळमळीनें त्याला धीट बनविलें म्हणजे कलाविलास न होतांहि तो वाङ्मय निर्माण करील. इंग्रजी बायबलची भाषा आज आपणाला फार सुंदर वाटते, कारण सर्व इंग्रजी वाङ्मय त्या बायबलच्या भाषेच्या वळणावर गेलें. आधीं सत्य व मग कलाविलास असें इंग्रजीच्या बाबतींत झालें. कलाविलासासाठीं अडेल तट्टू सत्य झुगारून कलाविलासापुढें मान खालीं घालील असें सत्य तयार करण्याचें इंग्रजी भाषेनें मनांत आणलें नाहीं.

तेव्हां पहिल्यानें, आपली मराठी भाषा बिघडलेली आहे ही कल्पना सोडून दिली, आपल्या अंगीं असलेला आत्मविश्वास वाढूं दिला व आपलें सत्य शोधून काढलें, म्हणजे वाङ्मय तयार करण्यास लागणारी पहिली सामग्री जमविली असें कोणींहि समजण्यास हरकत नाहीं. आतां खिस्ती लोकांत वाङ्मयाच्या दृष्टीनें स्वतंत्र लेखकापुढें अडचणींचे कोणते डोंगर आहेत हें आपण पाहूं. हे डोंगर ओलांडून जाण्यास आपल्या प्रतिपाद्य विषयाविषयीं लागलेली तळमळ ही फार उपयोगी पडण्यासारखी आहे. रा. सुमित्रराव मोडक, रा. दशरथराव कदम, आपलें साहित्य सेवामंडळ, रावबहादूर आठवले वगैरेंनीं कोणाच्या तोंडाकडे न पाहतां आपलीं पुस्तकें स्वतः–नुकसानहि सोसून– छापून काढलीं ह्यावरून वाङ्मयाबद्दल आपल्या लोकांत किती तळमळ लागून राहिली आहे हें दिसून येईल. आपल्या पुस्तकांना गिऱ्हाईक मिळविणें, तीं छापून काढणें वगैरे सर्व ह्या ग्रंथ–कारांना स्वतःच करावें लागतें हें खरोखर फार शोचनीय आहे.

आमच्या पुस्तकांच्या

## प्रसिद्धीच्या अडचणी

दोन प्रकारच्या आहेत. एक प्रसिद्धी संस्थांचीं आपसांतील भांडणें व दुसरें ग्रंथकाराबद्दल खाजगी द्वेष. नांव घेण्यासारख्या आमच्यांत ज्या प्रसिध्दी संस्था आहेत त्यांच्यांत आपसांत भांडणें आहेत असें दिसतें. त्यांच्याजवळ पैसा पुष्कळ आहे. इतका आहे कीं मनांत आणलें तर दरसाल उत्तमोत्तम ग्रंथप्रसिद्धी त्यांना करतां येण्यासारखी आहे. परंतु त्यांच्या हातून एखाद दुसरेंहि नांव घेण्यासारखें पुस्तक बाहेर पडण्याची मारामार पडते. बरें नवीन पुस्तकें काढायाचीं नाहींत असें त्यांचें ठरलें आहे म्हणावें, तर जुनीं उत्तमोत्तम पुस्तकें, जीं आज अत्यंत दुर्मिळ झालीं आहेत, त्यांचेंहि पुनर्मुद्रण ह्यांच्या हातून होत नाहीं. पुनर्मुद्रणाला डोकें खर्च करावें लागत नाहीं, लेखणीचें बळ असावें लागतें असें नाहीं किंवा भाषेचेंहि ज्ञान असावें लागत नाहीं. पण तेवढेंहि कार्य ह्या संस्था करीत नाहींत. ही शोचनीयच नव्हे तर लाजीरवाणी स्थिती आहे. ह्या संस्थांच्या नादीं न लागतां आपलीं पुस्तकें आपणच प्रसिद्ध करून विकण्याचें कोणीं मनांत आणल्यास त्यालाहि पायबंद घालण्यासाठीं कांहीं हरीचे लाल टपून बसलेले असतात ह्याचा मला प्रत्यक्ष अनुभव आहे. कित्येकांचा खाजगी द्वेष माझ्या स्वतःच्या ग्रंथविक्रीच्या आड आलेला आहे. एकदां माझ्याकडे कांहीं खिस्ती पुस्तकविक्रे आले. त्यांनीं सांगितलें, कीं माझें बोधसुधा पुस्तक पुष्कळ लोक मागतात परंतु तें त्यांना जवळ ठेवण्यास त्यांच्या वरिष्ट अधिकाऱ्यांची मनाई आहे ! ह्याचें कारण काय असें विचारतां तुमच्या–विरुद्ध आमचे अधिकारी आहेत असें स्पष्ट उत्तर देण्यांत आलें ! माझ्या दुसऱ्या एका पुस्तकासंबंधीं तर मला ह्याहूनहि वाईट अनुभव नुकताच आलेला आहे. परंतु त्याचा अधिक उल्लेख सध्यांच मी करीत नाहीं. असले हे अनुभव वर उल्लेखलेल्या बहुतेक ग्रंथकारांनाहि आले असतील.

आणखी एक अडचण म्हणजे आम्हाला आमचें—अगदीं पूर्णपणें आमचें म्हणतां येईल—असें मराठी वर्तमानपत्र नाहीं. वर्तमानपत्रासारखी लेखक निर्माण करण्याची दुसरी शाळा नाहीं.

## वाचक वर्ग

लेखक निर्माण करीत असतो. सदभिरुची असलेला वाचक वर्ग असला व त्यानें लेखकाची पाठ थोपटली म्हणजे लेखकाला आणखी मोठें पारितोषक तें काय पाहिजे ? तो बिचारा तेवढ्यावरहि संतुष्ट होतो.

दृष्टीविना दृश्य करील काय
चैतन्य जें त्याविण रम्य काय

परंतु उत्तम हस्ताक्षर होण्यास तें आधीं गिरवावें लागते. तें गिरविण्यास कागद, स्लेटपाटी, नाहींतर निदान धुळीची तरी पाटी लागते. ही धुळीची पाटी म्हणजे आज आपलें ज्ञानोदय पत्र आहे.

ज्ञानोदय माझ्या हातांत आल्यापासून कित्येक विद्वानांच्या मतें त्यांत भारदस्त लेख येण्याचें बंद झालें आहें. विद्वानांचा हा अभिप्राय मलाहि कबूल आहे, शिरसावंद्य आहे. पण विद्वान हें विसरतात कीं मी ज्ञानोदयाची धूळपाटी बनविली आहे; कितीतरी लेखकांना व कवींना ज्ञानोदयाच्या धूळपाटीवर अक्षर घटविण्याची संधी मिळत आहे. आतां हें कबूल आहे कीं ज्ञानोदयाचा असा उपयोग केल्यानें वाचक वर्गाचे थोडेंसें नुकसान होतें आहे. पण एक फूट लांबीच्या व तीन इंच रुंदीच्या तेरा स्तंभांनीं करावयाचें तरी काय काय? भारदस्त लेखासाठीं दर आठवड्याला कमींत कमी सहा स्तंभ पाहिजेत. बाकी उरले सात. पैकीं एक स्तंभ वर्तमानसंग्रहाला दिलेंच पाहिजे; नाहीं तर खेड्यापाड्यांतील वाचकांना जगांत काय चाललें आहे हेंहि कळणें अशक्य होईल. उरले स्तंभ सहा. एवढे सहा स्तंभ संपादकीय स्फुटांना व अग्रलेखांना गेल्यावर इतर लेखकांना काय जागा मिळणार?

माझ्या स्वतःच्या ज्ञानाचें प्रदर्शन करण्यापेक्षां किंवा इतर भारदस्त लेखकांचे लेख मिळविण्यापेक्षां आपले गरीबगुरीब होतकरू लेखक पुढें आणण्याचेंच माझें ध्येय असून त्याला अनुसरणें मी आपलें पवित्र कर्तव्य समजत असल्यानें आज ज्ञानोदयांत पुष्कळ अज्ञात लेखकांचे लेख प्रसिद्ध होत असतात. पुष्कळसे लेख अगदींच मूळस्वरूपांत प्रसिद्ध होत नाहींत. त्या लेखांचें मूळ स्वरूप त्यांच्या लेखकांना व मलाच केवळ माहित असतें. तीच गोष्ट पुष्कळशा कवितांची.

लिहिण्याची इच्छा किती व किती लोकांना असते हें माझें ज्ञानोदयाचें टपाल पाहणाराच्या तेव्हांच ध्यानांत येईल. कराचीपासून बेळगांवपर्यंतच्या व मुंबईपासून भंडाऱ्यापर्यंतच्या मराठी ख्रिस्ती लोकांना लिहिण्याची अनावर इच्छा आहे हें मी माझ्या ज्ञानोदय व बालबोधमेवा ह्या लेखनेच्छामापक यंत्रांवरून चांगलें सांगूं शकेन.

आमच्या लेखकांना व कवींना ख्रिस्ती पत्रांच्या बाहेर दुसरें कोणी बहुतकरून आश्रय देत नाहीं. ख्रिस्ती लोकांच्या निंदेचा एखादा लेख बाहेरचीं पत्रें छापतील, परंतु इतर लेख ते सहसा छापणार नाहींत. व त्यांत त्यांची चूक आहे असें माझें म्हणणें नाहीं. त्यांच्याजवळ तरी त्यांच्या वाचकांना नको असलेले विषय घ्या असा आग्रह कसा धरतां येईल?

पूर्णपणें मराठी वर्तमानपत्र पाहिजे. ज्ञानोदयांत मराठीला सारीं १३ कॉलमें दिलेली आहेत. संपादकाला दोन गोष्टी कराव्या लागतात. लेखकाला उत्तेजन द्यावें लागतें व वाचकांचें हितहि डोळ्यांपुढें ठेवावें लागतें. वाचकांचें हित डोळ्यापुढें ठेवायाचें म्हणजे लेखकांना उत्तेजन देण्याचें काम संपादकानें अजिबात बंद ठेवलें पाहिजे व फक्त उत्तमोत्तम लेखच मिळवून ते छापले पाहिजेत. पण तें मिळणें, जोंपर्यंत लेखक तयार करायाचें काम संपादकाला करायाचें असेल तोंपर्यंत शक्य नाहीं.

कारण भारदस्त लेखक आमच्या ह्या लेखकशाळेंतील बिगारींतील किंवा पहिलींतील मुलांबरोबर बसण्यास तयार होणार नाहींत. दुसरी अडचण म्हणजे भारदस्त लेखांच्या अभावी वर्गणीदार वाढत नाहींत. वर्गणीदार वाढले नाहींत म्हणजे, जाहिरातदार मिळणें शक्य नाहीं. म्हणजे वर्गणीचें व जाहिरातींचें उत्पन्न घटलें. तें घटलें म्हणजे भारदस्त व अभ्यासित लेख लिहिणारांना मोबदल्याचें मधाचें बोट लावतां येणें शक्य नाहीं.

किर्लोस्कर मासिकांत भारदस्त लेख येतात. कारण लेखकांस मोबदला देण्यांत येतो. लेखकांना मोबदला देण्यांत येतो कारण उत्पन्न फार चांगलें आहे. उत्पन्न फार चांगलें कारण वाचकांची संख्या एक लाखाहून अधिक आहे. वाचकांची संख्या एक लाख म्हणून जाहिरातदारांची गर्दी होते. व वाचक व जाहिरातदार मासिकास इतकें उत्पन्न करून देतात कीं उत्तमोत्तम लेखकांना आपला अमोल्य वेळ खर्च करण्यास सवड काढावी लागते, कारण त्या वेळाबद्दल त्यांना मोबदला मिळतो.

आपल्याकडे ही स्थिती कधीं उत्पन्न होईल किंवा नाहीं सांगतां येत नाहीं. महाराष्ट्रीय ख्रिस्ती लोकांसाठीं ज्ञानोदय तरी पूर्ण मराठी होण्यास पाहिजे किंवा दुसरें एखादें पूर्ण मराठी साप्ताहिक निघण्यास पाहिजे. परंतु ज्ञानोदय जिवंत असेपर्यंत दुसऱ्या साप्ताहिकाला जागा नाहीं हेंहि तितकेंच खात्रीपूर्वक म्हणतां येईल. कारण ज्ञानोदयामागें ९० वर्षांचा इतिहास आहे, ज्ञानोदयामागें पैसा आहे व ज्ञानोदयाचें कोड-कौतुक करणाऱ्या मिशनरूपी सहा मावशा त्याच्या पाठीशीं आहेत.

आजपर्यंत ख्रिस्ती नागरीक, समाजादर्श, मेसेज वगैरे पत्रांचा व मासिकांचा जन्म उत्कर्ष व लय होऊन समाजाची फार दिवसांची ही मूक इच्छा त्यांनीं बोलून दाखविली. डॉ. हिवाळे ह्यांचें ख्रिस्ती लोक-

शिक्षण हें मासीकहि हेंच सांगतें. हें मासिक पूर्ण जोमांत चालून चिरायु होवो असें मी इच्छितों. परंतु सध्यांच्या स्थितींत ज्ञानोदय हेंच पत्र आपण आपलें केलें पाहिजे. तसें करणें आपल्या हातांत आहे. ज्ञानोदयाच्या ज्या सहा मावशा आहेत त्यांच्या मुलाबाळांनीं ओरड केली पाहिजे कीं, आम्हाला केवळ मराठीच पत्र पाहिजे. ज्ञानोदय पूर्ण मराठी झालें व त्याला १३ ऐवजीं २६ कॉलमें मिळूं लागलीं म्हणजे वर सांगितलेली, सध्यां जी अडचण संपादकाला वाटते ती दूर होऊन त्याला भारदस्त लेख मिळ-वितां येतील व त्याचवेळेस लेखकहि तयार करण्याचें काम पूर्वीप्रमाणें सुरळितपणें चालवितां येईल. आपली मागणी इतकी योग्य आहे कीं ती मान्य करणें मिशनांना भागच पडेल. मात्र ती योग्य-प्रकारें, अगदीं नेटानें व सुव्यवस्थित रीतीनें केली पाहिजे.

आपल्याला ही गरज पटली तर आपण आपलें म्हणणें खरें करूं. आतां वेळ अशी आली आहे कीं मिशनांचे आईपण व मिशनरींचें बापपण आपण झुगारून दिलें पाहिजे. आपलें आपलेंपण आपणच बन-विलें पाहिजे. वर्षानुवर्षें आपलें दाईपण दुसऱ्यांना करूं देणें म्हणजे आपला नादानपणा व्यक्त करण्यासारखें आहे. कोणीहि स्वाभिमानी माणूस किंवा कोणताहि स्वाभिमानी समाज ही चूक ध्यानांत येतांच परकी पांगुळगाडे सोडून देईल. तो पडेल पण स्वतःच्या पायांवर उभा राहतांना पडेल व पडतां पडतांच हळूहळू न पडण्याचेंहि शिकेल.

आमच्यांतील पुष्कळसे लोक मिशनचे नोकर आहेत. मिशनरी हे त्यांचे धनी आहेत. इतर धन्यापेक्षां हे धनी पुष्कळ गोष्टींनीं चांगले असतील. त्यांचें धनीपण प्रेमळ आईबापाच्यासारखें असेल. आपलीं बाळें कशीं वागतात, काय करतात, काय वाचतात इकडे त्यांचें बारीक लक्ष्य असेल. त्यांचा हेतुहि अगदीं शुद्ध असेल. परंतु शुद्ध हेतूनें व अगदीं प्रेमानें एखादी आई आपल्या मुलाला सदाचेंच बाळंत्यांत गुंडाळून ठेवूं

लागली तर तें किती हास्यास्पद होईल !

आपल्या लोकांच्या हातांत चांगल्या तऱ्हेचें मराठी वाङ्मय पडावें ही सदीच्छा कोणीहि वाखाणील. परंतु चांगल्या तऱ्हेचें वाङ्मय नाहीं अशा कल्पनेनें आपणच तें देणें व आपल्या लोकांना स्वतः तें निर्माण करूं देण्याच्या मार्गांत अप्रत्यक्षरीतीनें अडथळे उत्पन्न करणें ह्याला मात्र कोणी योग्य म्हणणार नाहीं.

माझें म्हणणें कांहीं उदाहरणें देऊन मी आणखी थोडें स्पष्ट करतों.

पुष्कळसे मिशनरी आपल्या लॅंग्वेजस्कूलच्या दोन परीक्षांपलीकडे मराठी वाचण्याच्या भानगडींत पडत नाहींत. जे कित्येक वाचतात तें अगदीं वरवर व कामापुरतें. ह्यामुळें एखाद्या मराठी पुस्तकाची किंमत ठरवायाची झाली तर त्यांना वरवरच्या गोष्टींवरून ती ठरवावी लागते. किंवा त्यांच्यातील जे कित्येक शहाणे ठरलेले असतात त्यांच्या मतानें ती ठरवावी लागते. ह्या शहाण्यांच्याबद्दल थोडा वेळानें अधिक विस्तारानें मी सांगेन. आधीं वरवरच्या गोष्टींवरून मिशनरींच्या दृष्टीनें वाङ्मयाची किंमत कशी ठरते ह्याचा एक अनुभव मला नुकताच आला आहे तो सांगतों.

माझ्या जातककथा पुस्तकावर गौतमबुद्धाचें चित्र आहे. एवढ्यासाठीं एका मिशनरी मडमेनें त्या पुस्तकाला आश्रय देण्याचें टाळलें ! लेखकाचें नांवहि कित्येक वेळला ह्या प्रकारच्या मिशनरींच्या आश्रयाच्या आड आलेलें आहे.

मराठी तेवढें वाईट, असाहि क्वचित् कांहीं मिशनरींचा समज झालेला दिसतो. असे मिशनरी फारच थोडे आहेत परंतु ते आहेत ह्यांत शंका नाहीं. नागपुरास मी कॉलेजमध्यें असतांना एक दृश्य पाहिलें. तें मी कधीं विसरणार नाहीं. एक विद्यार्थी मराठी पुस्तक वाचीत बसला होता.

कॉलेजचे एक अधिकारी—हे आतां दिवंगत झाले आहेत—तेथें आले. ह्या विद्यार्थ्याच्या हातांत मराठी पुस्तक पाहतांच साहेब मजकूर इतके गरम झाले कीं मागचापुढचा कांहीं विचार न करतां त्यांनीं त्याला आडवा तिडवा बडविण्यास सुरुवात केली. पुढें ती स्कॉटची मराठींत उतरलेली एक कादंबरी आहे असें समजल्यावर प्रिन्सिपाल साहेब शांत झाले व त्यांनीं आपली दिलगिरीहि तावडतोब व्यक्त केली. ह्यांत विद्यार्थ्याला मारलें ही गोष्ट जरी बाजूला ठेवली तरी मराठीबद्दल जो तिटकारा त्या कृत्यानें त्यांनीं दाखविला तो खरोखरच निषेधार्ह आहे.

एका अतिशय उत्तम मराठी बोलणाऱ्या व लिहिणाऱ्या मिशनरी बाईशीं माझा एकदां मराठी नाटकासंबंधीं मोठा कडाक्याचा वाद झाला. ह्या बाईच्या मराठी भाषाविषयक ज्ञानासंबंधीं कोणाला कांहीं बोलणें शक्य नव्हतें इतकें तें उत्तम आहे. मात्र त्यावेळेपर्यंत त्यांनीं एकहि मराठी नाटक वाचलेलें नव्हतें. तरी मराठी नाटकांत फाजीलपणा फार असतो हें म्हणण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. मीं त्यांना सांगितलें शेक्सपीअरच्या अथल्लो किंवा हॅम्लेट नाटकांत कित्येक ठिकाणीं जो फाजीलपणा दिसून येतो त्याच्या शतांशानेंहि आमच्या नाटकांत तो सांपडणार नाहीं. शेवटीं माझ्या आग्रहाला ‘ बळी पडून ’ त्यांनीं गडकऱ्यांचें पुण्यप्रभाव नाटक वाचलें तेव्हां त्यांची मराठी नाटकासंबंधीं दृष्टी निवळली.

परंतु असल्या तऱ्हेनें आपला विरोध उघडपणें दाखविणारी मंडळी बरी. त्यांना तोंड देणें अवघड नसतें. शिवाय हीं माणसें प्रामाणिक असल्यानें त्यांची नीटशी समजूत केल्यावर तुमचीहि बाजू तितक्याच आपलेपणानें हीं ओढून धरतील. खिस्ती वाङ्मयाला खरें भय असतें तें शहाण्यांचें. ह्या शहाण्यांना खरोखर मराठीचें ज्ञान असतें अगदीं बेताचेंच परंतु तें पुष्कळ आहे असें दाखविण्याची हातोटी त्यांना चांगली साधलेली असतें. शंभरांत असा एकच शहाणा सांपडेल. कधींकधीं हे

प्रमाण त्याच्याहूनहि कमीच पडेल. पण इतर मिशनरी अशा शहाण्यांच्याच मताला फार महत्व देतात. शहाण्यांनाहि आपला बोज कायम ठेवायाचा असल्यानें प्रत्येक बाबतींत मत द्यावयाचें असतें. पुष्कळदा मत दिल्या-नंतर तें चूक आहे असें लक्ष्यांत आलें तरी पुन्हां तोच बोज आडवा येतो व तो संभाळण्यासाठीं त्यांना जुन्याच मताला टेंकू कुबड्या शोधीत बसावें लागतें. असे हे शहाणे मिशनरींमध्यें असतात तसेच हिंदी ख्रिस्ती लोकांतहि असतात. ज्यांना मराठीचें कांहीं ज्ञान आहे त्यांना ह्या शहा-ण्यांचें शहाणपण उंटावर मिरवत असलेलें दिसलें तरी मराठी वाङ्मयाची किंमत दुसऱ्याच्या मतावरून ठरविणाऱ्या बहुसंख्याक मिशनरीला ते त्या स्वरूपांत दिसून येत नाहीं. राम गणेश गडकरी ह्यांच्या विनोदावर एक टीकात्मक पुस्तक लिहिण्यांत आलेलें आहे. त्या पुस्तकांत विनोदाची एकहि ओळ नाहीं. परंतु एका शहाण्यानें ह्या पुस्तकावर असा शेरा दिला कीं Gadkaryancha Vinod is not a sufficiently serious or high class Marathi book, being more or less humourous.' वरील विधान किती असत्य व हास्यास्पद आहे हें एखादा शाळेंत जाणारा विद्यार्थीहि सांगू शकेल. पुस्तक न वाचतां मत ठोकून देण्याच्या धाष्टर्याचा हा एक उत्तम नमुना आहे. 'गडकऱ्यांचा विनोद' हें पुस्तक विनोदी नसून टीकात्मक आहे हें माहीत नसल्यानें पुस्तकाच्या नुसत्या नांवानें फसून गृहस्थानें हें जें मत दिलें आहे त्यानें मात्र बराच विनोद उत्पन्न झाला आहे. मराठी पुस्तकांची नुसती तोंड ओळख जरी ह्या गृहस्थांना असती तरी त्यांना गडकऱ्यांचा विनोद 'संपूर्ण बाळकराम' नांवाच्या पुस्तकांत आहे हें समजलें असतें. शिवाय ज्या गडकऱ्यांच्या विनोदाला तो इंग्रजींत रूपान्तरित केल्यास, त्याहि वाङ्मयांत अग्रस्थान मिळालें असतें त्यावर एका साहेबानें Not high class Marathi

असा शेरा देणें म्हणजे नुसतें स्वत:चें अज्ञान प्रगट करणें नसून मराठी वाङ्मयाचा अपमान करणें आहे. ह्या साहेबांना ज्या मानानें मराठी येतें त्या मानानें आमच्या एखाद्या हायस्कूलमधल्या विद्यार्थ्याला इंग्रजी येतें. असल्या एखाद्या विद्यार्थ्यानें मार्कट्वेनवर लाथा झाडल्या तर तें किती हास्यास्पद होईल? ह्याच गृहस्थानें आपल्या साहित्य सेवा मंडळानें प्रसिद्ध केलेल्या मराठी खिस्ती वाङ्मयाच्या इतिहासाला 'Serappy' म्हटलें आहे. तसेंच वामन मल्हार जोशी व श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांच्या अध्यक्षीय भाषनांना 'are not of sufficiently permanant value' म्हटलें आहे! वर दिलेलें मत ऐकून आपण हसाल. मलाहि हसूं येतें. पण ही कींव करण्यासारखी गोष्ट असली तरी आपल्या वाङ्मयवृद्धीच्या आड येणारी ही मोठी धोंड आहे हेंहि विसरतां कामां नये. कांहीं कांहीं वेळेला ह्या किल्ल्या कशा फिरतात व कोठें फिरतात तें आपल्याला कळत नाहीं. आपण तेवढीं कुलुपें बंद झालेलीं पाहतों. अशाच एका किल्लीचा नमुना हा आहे. एखादें वेळेस हीच किल्ली आणखी फिरून माझें हें भाषणच मिशनरींच्या कानापर्यंत न जाण्याची व्यवस्था व्हावयाची. तेवढ्याचसाठीं मी अध्यक्ष-पदावरून ह्या विषयाचा एवढा गोंगाट करीत आहें. माझ्या ह्या किंकाळ्यांतील एखादी जरी किंकाळी बहुजन मिशनरी समाजाच्या कानांवर गेली व ज्यांच्या मताला आपण एवढा मान देतों त्यांच्यापैकीं कित्येकांनीं वाङ्मयाचें नुसतें कातडें पांघरलेलें आहे एवढें जरी त्यांच्या ध्यानांत आलें तरी पुरें.

वरील विवेचनावरून असा मात्र कोणीं समज करून घेऊं नये कीं सर्वच मिशनरी वर्गाचा मराठी वाङ्मयाच्या वाढीला विरोध आहे. आमच्यांत रेवरेंड डॉक्टर मॅक्निकल, रेवरेंड आर. बी. डगलस, रेवरेंड फादर विन्स्लो, रेवरेंड डॉक्टर ई. फेअरबॅंक, रेवरेंड बिशप ॲकलंड,

डॉ. एमेलीबाई बिसेल ह्यांच्यासारखा मराठी भाषा समजणारी व मराठी भाषेची मनापासून कळकळ बाळगणारी मंडळी आहे.

पैशाच्या दृष्टीनें मराठी वाङ्मयाला साह्य करणारी मिशनरी मंडळीहि पुष्कळ आहे. मिस् पिर्कीन, मिसेस एच् फेअरबँक, मिस् फाउलर वगैरे मिशनरी स्त्रियांनीं स्वत: वाङ्मयांत भर घातलेला नसला तरी पैशाच्या दृष्टीनें स्वत:ची अडचण सोसून मराठी वाङ्मयाला मदत केलेली मला प्रत्यक्ष ठाऊक आहे. डॉ. एमेलीबाई बिसेल ह्यांनीं तर पुष्कळ वेळेला पुस्तकें खरेदी करण्यांत व तीं खिस्ती मुलांना वाटण्यांत स्वत:च्या पैशाच्या पाकीटाला कधींहि न शिवतां येण्यासारखीं मोठमोठालीं भोकें पाडून घेतलीं आहेत.

प. वा. रे. डॉ. ॲबट ह्यांनीं आपल्या संपत्तीचा जवळ जवळ निमा भाग मराठी साहित्याच्या पायांवर वाहिला. असल्या मिशनरींची आठवण झाली म्हणजे आरंभीं सांगितलेल्या दोनचार खड्यांची काहीं क्षिती वाटत नाहीं. न चावतां ते गिळून टाकावें झालें, असें वाटतें. पण हे खडे आहेत एवढी तरी जाणीव आमच्या मिशनरींनीं जागी ठेवावी.

नुकतेच मला दंडाबेडी आडाबेडी वगैरे शब्द पुष्कळ ऐकण्यास मिळाले आहेत. मराठी खिस्ती वाङ्मयाच्या वाढीच्या बाबतींत ज्या दंडाबेड्या व आडाबेड्या आहेत त्यांचा उल्लेख वर केला आहेत.

पुन्हां व शेवटचें मला सांगायाचें कीं आपल्या सत्याविषयीं आपली पूर्ण खात्री झाली म्हणजे ह्या बेड्या तटातट तोडून टाकण्याचें सामर्थ्य आपल्याला आपल्या अंगीं आणतां येणार आहे. मात्र आईचें आपल्या बाळावर जेवढें व जसें प्रेम असतें तेवढें व तसें आपलें आपल्या प्रतिपाद्य विषयावर प्रेम असलें पाहिजे.

मी पुष्कळ वर्षें शिक्षकाचें काम केलें असल्यानें माझा मूळस्वाभाव

४८०८

काँहीं अजून जात नाहीं. शेवटीं माझ्या विषयाचा पुन्हां एकदां थोडक्यांत सारांश दिल्याखेरीज माझें समाधान होणार नाहीं.

आपल्याला आपल्या अध्ययनावर आतां संतुष्ट व्हायाचें नाहीं. आपल्याला स्वतः वाङ्मय निर्माण करायाचें आहे. हें निर्माण करण्या-आधीं ख्रिस्ती लोकांची मराठी भाषा बिघडली आहे असा जो डांगोरा पिटण्यांत येत आहे तिकडे दुर्लक्ष्य करून—ती समजूत खोटी आहे हें मनाला निश्चयानें सांगून आत्मविश्वास वाढवायाचा आहे. हें झाल्यानंतर आपण आपलें सत्य शोधून काढलें पाहिजे. सत्याला आपल्या बुद्धीनें शोधून, तें हृदयाला पटलें व सदसद्विवेकानें तें 'पास' केलें म्हणजे त्याच्याविषयीं इतकें प्रेम वाटूं लागतें कीं आपण तें पुढें मांडण्यास यत्किंचित्‌हि कचरणार नाहीं. असें हें सत्य पुढें मांडायाचें ही आपली पहिली कामगिरी. ती करीत असतां कलाविकास आपोआप होत जाईल. आपल्या मार्गांत घरच्या व बाहेरच्या आहेत तेवढ्या अडचणी दूर सारण्याचें आपल्याला सामर्थ्य प्राप्त होईल असा भरंवसा आपण बाळगला पाहिजे.

आपली जन्मभूमि अंतीं जगाचें गुरुस्थान मिळविणार आहे हें आपल्या कविरायाचें भविष्य आपल्याला आपल्या डोळ्यापुढें ठेवण्यास मी विनविणार आहें. व आपल्या जन्मभूमीला तें स्थान मिळवून देण्यांत आपलाहि हात असणार आहे.

**तूझ्या महोदार सारस्वताच्या महासागरीचा जरी मीन मी**
**झालों, तरी गे तृषा मन्मनाची कधींही कधींही न होणें कमी**
**आई ! गुरुस्थान अन्तीं जगाचें तुझें ! यांत शङ्का न कांहीं जरी**
**सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मी न कोठें तरी.**

REFBK-0004808